From - The Government Printer & Publisher

दैनिक-समाज दि. 15-8-54 पृ. २१

हा सीमा भाग मराठीच !

☆ महाराष्ट्राच्या सीमा भागांत अतिक्रमण करणाऱ्या कन्नडीगांना स्थानिक जनतेनें कोणते उत्तर दिले ? सीमा भागांत काय वस्तूस्थिती आहे ? याची साधार माहिती या लेखांत वाचा !

Date :- 15-8-1954

-: लेखक :-

श्री. बी. ए. माने

चिटणीस, महाराष्ट्र एकिक[illegible] समिती, शाखा :- गडहिंग्लज.

भौ. पाजलअली यांच्या नेतृत्वाखालील राज्यपूनर्रचना मंडळ जेव्हा बेळगांवला आलें होतें त्यावेळीं बेळगांव जिल्हा महाराष्ट्र एकीकरण समितीनें खालील वस्तुस्थितीं ज्या त्या अधिकृत प्रतिनिधी समवेत मांडली.ती अशी. बेळगांवपासून कागल पर्यंतच्या मार्गावर म्हणजे बेंगलोर पूना रोड वरील सरहद्दीची माहिती भाषिकांच्या आंकडेवारीनें स्पष्ट केली आहे, सलग अशी गांवे घेवून भौगोलिक आणि सांस्कृतीक दृष्टया हा भाग कसा संयुक्त महाराष्ट्राचा घटक राहू शकतो याचा पुरावा भरपूर त्यांची सादर केला आहे. बहुतेक कर्नाटक आणि महाराष्ट्र भाषिक प्रदेशामधील वादाच प्रश्न अत्यंत सुलभ झालेला आहे अशी खात्री महाराष्ट्र एकीकरण समितीला झालेली आहे. आणि ठिकठिकाणीं महाराष्ट्र एकीकरण समितीनें जाहीर सभा घेवून आपल्या बहुमताची खात्री सर्वांना जाहीर आव्हानानें पटऊन दिलेली आहे.

नूल येथें तारीख४-७-५४इ.रोजी भरलेले सम्मेलन, तारीख२६-७-५४ इ. रोजीं संकेश्वर येथें ९ हजार जनसमुदायाची जाहीर सभा आणि त्यामधील पास झालेले ठराव वगैरे पाहिले म्हणजे कोणाचीहि खात्री पटेल कीं, सलग आणि बहुसंख्य मराठी भाषिकांचीच आम्ही गांवे मागतो. गांवचे युनिट धरूनच आम्हीं ही सलगता निर्माण केलेली आहे. गांवच्या युनिटनें तालुक्याची गांवे वेगळी कशी सार्थ आहेत याचे प्रत्यंतर आम्ही दिलेलेच आहे. निपाणी तालुका कडच हा भाग कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड हा सलग असा हुकेरी तालुक्यातील कांहीं सलग, गांवे दिलेली आहेत त्यांची मराठी भाषिक आकडेवारी खालीलप्रमाणे आहे. १६ गांवाचा हा गट आहे.

खवणेवाडी–३४६, धोंडगट्टी–४४४, बेळकी–१७२ कोट, १००७ पोदगे–९२९, सलामावाडी–४३३, शेंट्टीहाळी ८१८, मणगुती–३०८१, भरापूर–६०६, मतीवडें–१३५०, कणगळे–३६७८, हिरणी–१४१४, राशींग–७५१, अलूक–४३१, शिपूर–१३४७, नांगनूर मजरे–७८१, सेकीन हाळूर–२३०, नांगनूर (सोलापूर) ३३६, हरगापुरगड–२०९२, करजगे-१९०२,बाड-१९६६,सोलापूर-३१९२सकेश्वर-१३१८६,दड्डी-१५०८, कामेवाडी–९४०, अकीवाट–४८०, आलदार–२२२, आलूर बुद्रमतोळी–४४१, अंकली–१७२३, आप्पाळ–५८४, विद्रेवाडी–५८७, हारलगे–६३८, खानापूर–३७३१, कोणकेरी–२११३,व्हनोळी–८१६,केस्ती–१४२५ यांची एकूण संख्या ५५०८८ आहे, त्यापैकीं मराठी भाषिक ४००८८, कानडी भाषिक १५०००, कारवार आणि बेळगांव जिल्ह्यात मराठी भाषिक ९ लाख आहे. त्यापैकी ७ लाख मराठे आणि मराठी भाषिक असून २ लाख मुसलमान मराठी भाषिक आहेत

दड्डी आणि रामेवाडी

दड्डी आणि रामेवाडी जरी पर्यायानें दोन गांवे दिसत असली तरी ही दोन्ही गांवे एकच आहेत. यांची पंचायत कमेटी ही एकच आहे.व्यापार वस्ती म्हणून दड्डी ही निराळधा स्वरुपांत दिसत आहे. सभोवतालच्या १५ गांवचे हें सेंटर आहे या गांवाची मराठी भाषिक प्रमाणें शेकडा ९० आहे. रामेवाडी दड्डी मिळून एक कानडी शाळा आणि एक मराठी शाळा अशा २ शाळा आहेत. त्यांचे प्रमाण खालीलप्रमाणें आहे.

मराठी विद्यार्थी संख्या	१८०
कानडी ,, ,,	१३०

भाषिक लोकसंख्या एकूण १५००, मराठी ९०० कानडी ४००,उर्दू २००.

गडहिंग्लज तालुका हा सर्वस्वी पूर्वापार महाराष्ट्राशी संबंधीत आहे कोल्हापूर संस्थानांतील हा एक तालुका होता. आणि आजही हा महाराष्ट्राशीच सरकारी दप्तर आणि इतर नात्यानी निगडीत आहे. मराठी भाषिक प्रमाण ८० टक्क्याच्यावर आहे. कानडी लिहीता वाचता येणारी लोकसंख्या कांहींच नाहीं. अलिकड पुर्व भागांतील ३।४ गांवांत कानडी शाळा उघडण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्याची एकूण विद्यार्थी संख्या शंभरहि भरत नाहीं. यापूर्वी कानडी शाळा खुद्द गडहिंग्लजमध्यें स्थापन करून पाहिली पण ती शाळा ६ महिने देखील टिकली नाही. यावरुन महाराष्ट्रीय संस्कृती किती रुजलेली आहे हे सिद्ध होते. कानडी अभिमान्यानी म्हणजे हुकेरी तालुक्यांतील कानडी प्रचारकांनी आमच्या तालुक्यांत प्रचाराचा गोंधळ माजल म्हणून लागलीच पूर्व भागांतील जनतेनी आपआपल्या ग्रामपंचायतीमध्यें आणि सोसायटीमध्यें ठराव करून "आपला गांव महाराष्ट्राचा अविभाज्य घटक आहे. सांस्कृतिक, भाषिक, ऐतिहासिक आणि भौगोलिक सलग असा महाराष्ट्राशीं निगडीत आहे, तेव्हां जातीचा आधार घेऊन कोणीहि येथें प्रचार करू नयें. त्यांच्या या जातिय प्रचाराचा आम्ही धिक्कार करतो.' असें प्रत्येकांनीं जाहीर केलें आहे. गडहिंग्लज म्युनिसिपालीटीचाहि असा बिनविरोध ठराव आहे. सर्वांचे ठराव एकमुखी आहेत त्यामुळे येथील कानडी प्रचार थांबला आहे. वाद मिटला आहे. हा तालुका संपूर्ण महाराष्ट्राचा [illegible] हे निसंशय आहे.खानेसुमारी रिपोर्ट पाहून सर्वांना क[illegible] चुकले आहे.

गडहिंग्लज तालुक्यांत एकून ९० गांवे आहेंत,त्यापैकी ३ गांवे बेचीराख झाली आहेत. तालुक्याची एकून लोक संख्या १ लाख ११ हजार ४ शे १४ आहें.

गडहिंग्लजचा पश्चिम भाग नूल-पर्यंतचा दक्षिण भाग आणि सर्व नेसरी भाग यांची एकूण लोकसंख्या ७० हजार १९६ आहे. त्यापैकी फक्त ६८४९ लोकसंख्या जातीनें लिंगायत आहे. गांवांमध्ये कडगांव, नूल, भडगांव आणि नेसरी, महागांव सारखी मोठी गांवेही भरली आहेत. आतां उत्तर भाग आणि हलकर्णी भाग दाखवीण्यांची आहे आणि पूर्वेकडील कांहीं गांवेहि धरावयाची आहेत. या भागाची एकूण वस्ती ३६७८१ आहे त्यापैकी लिंगायत लोकवस्ती ८९५० आहे तालुक्यांत एकूण जैन वस्ती फक्त हजार पर्यंत आहे. तालुक्यातील ब्राम्हण वस्ती जी आहे ती मराठी भाषिक आहे. सोनार, सुतार, न्हावी, परीट आणि इतर म्हणून जे जे असतील ते सर्व मराठी बोलतात. ख्रिश्चन आणि मुसलमान वसतीहि मराठीच बोलते. ख्रिचन वस्ती खुद्द गडहिंग्लज आणि नेसरी भागांत जास्त आहे. पण ते सर्व मराठी भाषिकच आहेत.

एकूण लिंगायत वस्ती सुमारें २० हजार पर्यन्त आहे. मात्र यांचे सर्व व्यवहार मराठीमधूनच चालतात. या सर्वांचे शिक्षण मराठी मधूनच झालेले आहे. आणि ऐतिहासिक भौगोलिक आणि सांस्कृतीक असे सर्व संबंध गडहिंग्लज तालुक्याचा पूर्वापार महाराष्ट्राशी आला असल्यानें पर्यायानें हे लिंगायत असले तरी यांचे सर्व संस्कार महाराष्ट्रीय संस्कृतीचे दिसून येतील. जमीनदारी आणि व्यापारी पेशा यांचाच मोठा आहे. तालुक्या[illegible] हे अल्पसंख्याक असले तरी [illegible] मोठा आहे

मागे नाहीत उलट यांचेच नेतृत्व बहुसंख्य जनतां ९० हजार लोक वस्तीला पूर्वोपार मान्यवर झालेले आहे. फक्त कांहीं संकेश्वरातील व्यापारी यांनी श्री. गणपतगुरुजी यांच्या सल्याने आमच्या तालुक्यांत थोडी कटूता निर्माण केली होती. पण तात्काळ ती कटूता मावळली आहे.

संकेश्वर तालुका करून घेणेसाठीं कानडी भाषिक नव्हे तर कानडी प्रेमीकांनी गडहिंग्लजचा हलकर्णी भाग आणि पूर्व भाग त्यांनी कर्नाटकासाठीं मागितला होता. परंतु संकेश्वरांतील बहुसंख्य मराठी भाषिकांनी त्यांना वेळीच पायबंद घातल्यानें सभोवतालच्या ३७ गांवच्या एकजुटीनें त्यांचे ... तत्काळ बंद झाले जिथें संकेश्वर आणि सभोवतालची ३७गांवे बहुसंख्य मराठी भाषिकांची आहेत. तिथें गडहिंग्लज तालुका कुठला त्यांच्या वाटचास जाईल?

एकूण रंग त्यांनी पाहिला. नवती चीड निर्माण करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. वस्तुस्थिती सत्य आहे तेव्हां बहुसंख्य अज्ञानी जनांचा दुरुपयोग आम्हीं कां करून घ्यावयाचा ? असा सुविचार कांहीं मान्यवर व्यापारी आणि सज्जन प्रतिष्ठीत प्रचारकांनें केल्यानें गडहिंग्लज तालुक्यांतील भाषिक वाद केव्हांही पेटला नाहीं.

उच्चाधिकार समितीकडे गडहिंग्लज तालुक्याचा हलकर्णी भाग आणि पूर्व भाग कांहीं कानडी अभिमान्यांनी निवेदन सादर करून मागितला होता. परंतु त्याच भागातील ग्रामपंचायत सोसायटी यानी बिनविरोध करून आपापला गांव महाचा अविभाज्य घटक आहे हा महाराष्ट्रातच रहाणार असे हीर केले आहे. हळकर्णी, वसर्गे, ळीकडे, नूल, जरकी, हेबाळ, आणि गी या सर्वांचे ठराव बिनविरोध ालेले आहे. उच्चाधिकार समितीकडे पाठविलेनें निवेदन किती निराधार आहे. आपोआपच सिद्ध होते.

—

भारतीय स्वातंत्र्याला शुभचिंतन

अल्पावधित आबालवृद्धांचे आवडते झालेले

कॉर्नर रेस्टॉरन्ट

महाद्वार रोड—कोल्हापूर

★ कचोरी ★ आंबोळी ★ मसाले वडे ★ पेढे इ,

ह्रतन्हेचे नित्य नवे रुचकर व ताजे पदार्थ × लज्जतदार चहा हे आमचे वैशिष्ट्य

साखऱ्या
मैदा यांचे
घाऊक व्यापारी
दरासाठी चौकशी करा.
कोल्हापूर इनव्हेस्टमेंट
ट्रस्ट लि.
चौक